NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 24 ) 1St August, 1999 ( NO : 7

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

Registered under the trade Union Act. 1926, No.By-II-8162 of 1985.

(Affiliated to the All India Federation of University and college Teachers' Organisations)

University Club House. B.Road, Churchgate, Mumbai-400 020

**DATE : JULY 18, 1999**

*The following resolution was adopted unanimously by the MFUCTO Executive Committee at its meeting held today.*

## RESOLUTION

# MFUCTO'S DETERMINATION TO FIGHT ON

The MFUCTO Executive Committee at its meeting held on 18th July 1999 reviewed the one-day cease work and courting of arrest programme on 7th July 1999. **The cease work programme was a great success** throughout the State, and over 6000 College and University teachers courted arrest on 7th July, **Through this mass action, the teachers have made a strong statement against the delaying tactics of the government of Maharashtra** on the question of implementing the revised Fifth Pay Commission related scales.

With the possibility of election to the State Assembly along with the parliament on 4th and 11th September 1999, the situation for the indefinite strike has changed considerably and materially. **The MFUCTO strongly condemns the stand of the Chief Minister and the State Government which after promising to solve the problem before 15th June 1999 has resolved to prepone the State elections to run away from the commitments to the people.** In the new situation, the MFUCTO Executive Committee resolves, inspite of the full preparation of the MFUCTO and the readiness of the college and University teachers to participate in the indefinite strike, **to hold the indefinite strike slated to start from 21st July 1999 in abeyance, and to change its line of struggle by converting the proposed indefinite strike into a massive campaign during the month of August 1999 to expose the attacks on education in general and the teachers in particular.**

The MFUCTO will hold public conventions during the first three weeks of August 1999 throughout the State and invite all prospective candidates and political leaders from all parties, including the Education Minister, and press them to state their positions on Education. The MFUCTO demands that all political parties should include in their manifestoes a clear statement regarding Education and the problems of teachers.

**(Sambhaji Jadhaw)** Gen.Secretary

**(C.R.Sadasivan)** President

Mumbai, 18th July 1999

## THE MFUCTO STRONGLY CONDEMNS

**the stand of the Chief Minister and the State Government which after promising to solve the problem before 15th June 1999 has resolved to prepone the State elections**

## TO RUN AWAY FROM THE COMMITMENTS TO THE PEOPLE.

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या लागू करणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद* **बुधवार, दिनांक १ एप्रिल १९९९** *दुसरे अधिवेशन, १९९९*

*सर्वश्री बी.टी.देशमुख, व्हि.यू.डायगव्हाणे, प.म.पाटील,श्रीमती निशीगंधा मोगल,श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री दिवाकर पांडे, सुरेश भालेराव, हुसेन दलवाई यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.*

**विधान परिषद नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६१.**

**श्री.बी.टी.देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर) : महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या लागू करण्यासाठी येणा-या अतिरिक्त अर्थभाराच्या ८० टक्के भार राज्य शासनाला अदा करण्याची केंद्र शासनाने दाखविलेली तयारी, दिनांक २७ जुलै १९९८ रोजी व त्यानंतर ६ नोव्हेंबर १९९८ रोजी या बाबतच्या स्पष्ट सूचना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या शिक्षण खात्याने राज्य शासनाकडे पाठविणे, दिनांक १७ नोव्हेंबर १९९८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने पुन्हा राज्याच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांना पत्र पाठवून शासन निर्णय निर्गमित करुन केंद्र शासनाकडून निधीची मागणी करण्याविषयीच्या स्पष्ट सूचना देऊनही त्या बाबत कोणतीही कारवाई न होणे, शासनाच्या या भूमिकेच्या विरोधात दिनांक १५ मार्च १९९९ रोजी शेकडो प्राध्यापकांनी महाराष्टातील सर्व विद्यापीठावर निदर्शने करण्याचा आयोजीत केलेला कार्यक्रम, माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांना काळे झेंडे दाखवून केलेली व करण्यात येत असलेली निदर्शने, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या लागू करण्यामध्ये शासनाकडून अक्षम्य विलंब, त्यामुळे प्राध्यापकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण या बाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री.दत्ता राणे** (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचे निवेदन**

केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिनांक २७.७.१९९८ रोजी पाठविलेल्या पत्राव्दारे केंद्रीय विद्यापीठे व त्यास संलग्नित असणारी महाविद्यालये यातील शिक्षक कर्मचा-यास लागू केलेली वेतनश्रेणी व इतर बाबी राज्य शासनाने त्यांच्या अखत्यारीतील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक कर्मचा-यांना लागू करण्याबाबत विचार करावा असे सुचविले होते. त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक ६.११.१९९८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगास लिहिलेल्या पत्रान्वये दिनांक २७.७.१९९८ च्या योजनेत करण्यात आलेले बदल कळविले होते. या पत्राची प्रत राज्य शासनास दिनांक १७.११.१९९८ च्या पत्रान्वये अग्रेषित करण्यात आलेली आहे. या पत्रात केंद्र शासनाने असे कळविले आहे की राज्य शासनाने वेतन सुधारणेमुळे येणा-या अतिरिक्त खर्चाचा तपशील करुन पाठवावा जेणेकरुन त्यांना प्रस्तावाची तपासणी करुन राज्य शासनास केंद्राचा हिस्सा देण्याबाबतची कार्यवाही करता येईल.

वरील पत्रास अनुसरुन विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिलेल्या प्रस्तावित वेतनश्रेणी संदर्भात राज्य शासनाकडून आवश्यक ती माहीती संकलीत करुन आर्थिक भारासह प्रस्ताव तयार केला असून प्रस्तावाची छाननी चालू आहे. केंद्र शासन दिनांक १.१.१९९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत वेतन पुनर्रचनेमुळे येणा-या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे व त्यानंतर या संपूर्ण खर्चाची जबाबदारी राज्य शासनाने स्विकारावयाची आहे. केंद्र शासनाच्या पत्रानुसार तसेच राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या तीव्र भावना लक्षात घेवून राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे. प्रस्तावाची छाननी झाल्यावर व प्रस्तावास मंत्रीमंडळाची मंजूरी प्राप्त झाल्यावर याबाबतचे जरुर ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच केंद्र शासनाकडे निधिच्या मागणीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : या संदर्भात सभागृहामध्ये. . . . .

**श्रीमती नीला देसाई (खाली बसून)**: या संपूर्ण सेशन मध्ये शिक्षकांचेच प्रश्न जास्त प्रमाणात चर्चेला आहेत...

**सभापती** : या सभागृहामध्ये इतर कोठेही नसतात एवढे शिक्षक प्रतिनिधी आहेत. पदवीधरांचे जे ७ प्रतिनिधी आपल्या सभागृहामध्ये आहेत त्यांचे ५० टक्के मतदार हे शिक्षक असतात. तसेच इतर विभागावर चर्चा घडवून आणण्यासाठी कोणालाही प्रतिबंध केलेला नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला सरकारने तांत्रीक स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. मला या ठिकाणी माहिती घेण्याच्या दृष्टीने दोन तीन लहान लहान प्रश्न विचारावयाचे आहेत. या पूर्वी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेण्या बाबत निरनिराळ्या प्रकारे या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाने आपल्याला २७ जुलै,१९९८ रोजी पत्र लिहिलेले आहे. या पत्राचा विषय नमुद करतांना असे म्हटलेले आहे की, "Revision of payscales of teachers in Universities and colleges following the revision of pay-scales of Central Government employees on the recommendations of 5th Central pay commission." माझा पहिला प्रश्न असा आहे की, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीवर आधारीत असलेल्या या वेतनश्रेण्या आहेत, त्यांची अंमलबजावणी केली तर ८०:२० अनुदान देऊ असे केंद्राने या पत्राने आपल्याला कळविलेले आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

**श्री दत्ता राणे** : या त-हेचे पत्र शासनाला प्राप्त झालेले आहे असे निवेदनामध्येच स्पष्ट म्हटलेले आहे. आता आवश्यक ती माहिती संकलित केली जात आहे. मंत्रीमंडळापुढे ही माहिती आणण्यासाठी छाननी चालू आहे...

**श्री. बी.टी.देशमुख** : पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींवर आधारीत या वेतनश्रेण्या आहे हे या केंद्र शासनाच्या २७ जुलै,९८ व ६.११.९८ च्या पत्रांच्या विषयामध्येच म्हटलेले आहे... हे खरे आहे की नाही ?

**श्री. दत्ता राणे** : केंद्र सरकारचे जे २७ जुलैचे पत्र आलेले आहे त्यामध्ये मा.सदस्य म्हणतात तो उल्लेख आहे.

**श्री. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, ही चर्चा भरकटत जाण्याचे काहीही कारण नाही. मला या ठिकाणी माहीतीसाठी पुन्हा एक प्रश्न विचारुन माहिती घ्यावयाची आहे. महाराष्ट्र शासनाने निर्णय असा घेतलेला आहे की, "राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरिता स्वतंत्र

---

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

From :
**Prof. Dr. E.H.Kathale** Dated : 18 July 1999
Secretary, NUTA.
N, 162, Reshimbagh, Nagpur. 440 009

## वृत्तपत्र प्रसारण

***विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांचा २१ जुलै १९९९ पासूनचा बेमुदत संप स्थगित***

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी केंद्र शासनाने २७ जुलै, १९९८ च्या आदेशान्वये व त्यानंतर ६ नोव्हेंबर, १९९८ रोजीच्या सूचनांव्दारे मंजूर केलेली सुधारित वेतन श्रेणी लागू करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने निर्णय न घेतल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (एम.फक्टो) २१ जुलै, १९९९ पासून बेमुदत संपाचा निर्णय जाहीर केला होता. तथापि, निवडणूक आयोगाची आचार संहिता लक्षात घेता २१ जुलै, १९९९ पासूनचा बेमुदत संपाचा उपरोक्त निर्णय तूर्त स्थगित ठेवण्याचा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दि. १८ जुलै १९९९ रोजी मुंबई येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

(डॉ. एकनाथ कठाळे)
सचिव, नुटा

वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचा-यांकरिता वेतन आयोग नियुक्त करील त्या वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतननिश्चितीचे सुत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल." असा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने भोळे वेतन आयोगाच्या वेळी डिसेंबर ७७ मध्ये घेतलेला आहे हे खरे आहे की नाही ? तो निर्णय अजून बदलेला नाही हेही खरे आहे की नाही ?

**श्री दत्ता राणे :** मा.सदस्यांनी या ठिकाणी भोळे आयोगाचा जो उल्लेख केला आहे ती माहिती माझ्याजवळ नाही. मी ती तपासून घेईन...

**श्री.अरुण मेहता :** मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी या ठिकाणी शासन निर्णय वाचून दाखविलेला आहे ना ?

**श्री.दत्ता राणे :** हा प्रश्न यू.जी.सी. च्या वेतनश्रेणी संबंधीचा आहे. केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या आधारावर ज्या शिफारशी केल्या आहेत....

**श्री.बी.टी.देशमुख :** मा.मंत्री महोदयाजवळ संबंधित धोरणात्मक शासननिर्णयाची आवश्यक ती माहिती नसली तर सभागृहातील चर्चेवर अन्याय होतो आणि संबंधित शिक्षकांवर देखील अन्याय होतो. ती आवश्यक माहीती कोणती आहे? हे जरा समजून घ्या. महाराष्ट्र शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे. डिसेंबर १९७७ मध्ये आणि तो निर्णय मंत्री महोदयांना माहिती नाही, त्यामुळे सभागृहाचा उगाच वेळ जाणार आहे.

**श्री दत्ता राणे :** निवेदनामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "वरील पत्रास अनुसरुन विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिलेल्या प्रस्तावित वेतनश्रेणी संदर्भात राज्य शासनाकडून आवश्यक ती माहिती संकलित करुन आर्थिक भारासह प्रस्ताव तयार केला असून प्रस्तावाची छाननी चालू आहे."

**श्री.बी.टी.देशमुख :** मी ते विचारलेले नाही. मी जे विचारीत आहे ते जरा प्रथम समजून घ्या.

**सभापती :** आपण शांतपणे विचारा.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपल्याला ही माहिती नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा अशी विनंती आपण स्वतःच करा. मी या ठिकाणी शासनाचा पॉलीसी डिसीजन कोट करतो. "राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरिता स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता, केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचा-यांकरिता वेतन आयोग नियुक्त करिल त्या वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सुत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल" असा धोरणात्मक निर्णय भोळे वेतन आयोगाच्या शिफारशींवर निर्णय घेतांना डिसेंबर १९७७ मध्ये महाराष्ट्र शासनाने घेतला होता. हा निर्णय महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत बदलेला नाही हे माझे म्हणणे खरे आहे काय ?

**श्री.दत्ता राणे :** आता आपण जे कोट केले आहे त्यासंबधीची माहिती शासनाच्या दप्तरी उपलब्ध आहे.

---

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**
*University Club House. B.Road, Churchgate,*
***MUMBAI-400 020***

**C.R.Sadasivan** — President
**Sambhaji Jadhav** — General Secretary

Mumbai 23rd June 1999

Shri Narayan Rane,
Hon'ble Chief Minister, Maharashtra State,
Mantralaya, Mumbai 400 032.

**Sub : Your meeting with the MFUCTO delegation on revision of pay scales of University and College teachers.**

Dear Hon'ble Chief Minister,

At the instance of Prof. N.S.Pharande, Hon'ble Chairman of the Maharashtra Legislative Council it was very kind of you to have agreed to meet a delegation of the MFUCTO consisting of Prof. Dr. K.K. Theckedath, President of the all India Federation of the University and College teachers' Organisations (AIFUCTO) Prof. C.R.Sadasivan, President of the MFUCTO and four other teachers on Tuesday 22nd June 1999, in the office of the Hon'ble chairman of the Vidhan parishad. Prof. Pharande was also present at the meeting.

On the question of implementation of the Central Government's directives in relation to revision of pay scales, it was pointed out by us that the state government order was pending eventhough 11 other states in the country have implemented the central orders. You had observed that the file had not yet reached your goodself. You were kind enough to call and direct your personal secretary to locate the file and place the same before you on the next day, that is, 23rd June. To our query as to when would the decision be taken and what would be the decision. You were kind enough to assure us that it could even be in just two days time and that it would be a favourable decision. (अनुकूल निर्णय)

Since the MFUCTO has already submitted to you a detailed letter dt. 15th April 1999 as also the detailed Charter of Demands thereafter. It is our earnest request that the government decision in the matter of implementation of revised scales of pay may be taken immediately and necessary orders issued on or before 5th July 1999.

With kind regards

Yours Sincerely
(C.R.Sadasivan)
President MFUCTO

copy towarded with compliments to -

1. Prof. N.S.Phrande, Chairman, Maharashtra Vidhan Parishad, Vidhan Bhavan Nariman Point. Mumbai.

2. Shri. Datta Rane, Hon'ble Minister for Higher & Tech. Education, Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai - 400 032.

for information and necessary action.

---

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**
*University Club House. B.Road, Churchgate,*
***MUMBAI-400 020***

**C.R.Sadasivan** — President
**Sambhaji Jadhav** — General Secretary

Mumbai 23rd June 1999

Prof. N.S.Pharande,
Hon'ble Chairman, Maharashtra Legislative Council,
Council Hall, Mumbai.

Dear Hon'ble Prof. Pharande :

On behalf of the Executive Committee of the MFUCTO, I write this letter to place on record our grateful appreciation of your efforts for arranging a meeting between the Hon'ble Chief Minister of our State, Shri. Narayan Rane, and the MFUCTO delegation consisting of Professors Dr. K.K.Theckedath, President of the All India Federation of the University & College Teachers Organisations (AIFUCTO) C.R. Sadasivan, President of the MFUCTO, Dr. Arun Dixit, E.N.Manjrekar, D.M. Damle and A.P.Kulkarni, in your office. The purpose of the meeting was to impress upon the Hon'ble Chief Minister the urgent need to implement the central orders in respect of the revision of pay scales of University and College teachers in the State of Maharashtra.

We are confident that your efforts will bear fruits and that the government will arrive at its decision immediately and that it would be favourable as stated by the Hon'ble Chief Minister himself in your presence.

The MFUCTO has sent a letter to the Hon'ble Chief Minister detailing the discussion that took place at our meeting held on 22nd June 1999, a copy of which is enclosed for information and further action at your end.

With kind regards,

Yours sincerely
(C.R.Sadasivan)
President, MFUCTO

Encl : 1

**श्री.बी.टी.देशमुख :** माहिती उपलब्ध नाही असे आताच आपण म्हणाला होता.

**श्री.दत्ता राणे :** माहीती उपलब्ध नाही असे मी म्हणालो नाही. आता माझ्याजवळ ती माहीती नाही. आता आपण जे कोट केलेले आहे ते रेकार्डवर आलेले आहे.

**श्री. बी.टी.देशमुख :** माझा प्रश्न असा आहे की, मागच्या वेळी आपण सभागृहामध्ये असे सांगीतले होते की,हा निर्णय १.१.९६ पासुन लागू केला पाहीजे असा केन्द्र शासनाचा निर्णय आहे पण त्यानंतर काय निर्णय झाला ? पुन्हा चार वर्ग निर्माण झाले. आपण इतरांना १.१.१९९६ पासुन वेतन श्रेणी लागू केल्या. याबाबत आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या संदर्भात दिनांक ३०.९.१९९७ ला शासन निर्णय निघाला इतर शासकीय अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या संदर्भात डिसेंबर १९९८ मध्ये शासनाने निर्णय घेतला आणि जी.आर. काढला. माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात निर्णय घेतला पण जी.आर. काढला नाही. जो चौथा वर्ग आहे, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा, त्यांच्या संदर्भात निर्णय घेतला आहे काय? घेतला नसेल तर केव्हा घेणार?शासन निर्णय केव्हा काढणार?

**श्री.दत्ता राणे :** केंद्र शासन दिनांक १.१.१९९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत वेतन पुनर्रचनेमुळे घेणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे हे केंद्रशासनाच्या पत्रामधे आहे.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज मी काय विचारले? उत्तर देण्याची ही पद्धत बरोबर नाही.

**श्री.दत्ता राणे :** मी आपल्याला शांतपणे उत्तर देत आहे. या संबंधीचा निर्णय कधी होणार आहे आणि अवधी किती लागणार आहे या संबंधीचा आपला प्रश्न आहे. या संदर्भात निश्चीतपणे उत्तर दिलेले आहे या संबंधी लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न चालू आहेत. या बाबतीत उत्तरामधे खुलासा करण्यात आलेला आहे.की, या प्रस्तावाला कॅबिनेटची मान्यता मिळाली पाहीजे आणि त्या संदर्भात प्रयत्न केले जात आहेत.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, शासकीय सेवकांच्या बाबतीत डिसेंबर महीन्यामध्ये शासनाने शासन निर्णय काढला आहे. सन्माननिय मंत्रिमहोदयांनी प्रश्न निट ऐकून मग नंतर उत्तर द्यावे . याबाबतीत माझा प्रश्न असा आहे की,ऑक्टोबर १९९८ या महीन्यात कॅबिनेटने निर्णय घेतला; २० लाख शासकीय सेवकांच्या बाबतीत. त्या निर्णयाच्या बाबतीत एक रुपयाची मदत कोठुनही होत नाही. ऑक्टोबर १९९८ या महिन्यात निर्णय घेत असतांना २७ जुलै १९९८ चे पत्र तुमच्या कडे केंद्रशासनाकडुन आलेले होते. ९०० कोटी रुपयांचा जो अतिरीक्त भार या बाबतीत पडणार आहे, त्यापैकी ७२० कोटी रुपये आम्ही देण्यास तयार आहो असे केंद्रशासनाने कळविले होते असे असतांना त्याबाबतीत निर्णय का घेतला जात नाही, आपला उच्चशिक्षण विभाग काय काम करीत आहे? महाराष्ट्रातील सर्व लोकांना आपण काय मेसेज देतो ? ज्यांच्या बाबतीत एक रुपयाची मदत नाही. त्या २० लाख सेवकांच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला आहे. हे चांगले आहे. त्याला सुध्दा वेळ झाला आहे परंतू ठीक आहे; त्या संदर्भात आपण निर्णय घेतला आहे. तो निर्णय घेत असतांना ज्या प्रवर्गांच्या बाबतीत ८० टक्के मदत केंद्रशासनाकडून दिली जात आहे,पैसे घेवून जा असे दोन वेळा पत्र त्यांच्याकडुन आपणाला पाठविण्यात आलेले आहे, आश्वासन दिले गेले आहे, त्याबाबतीत मात्र निर्णय घेतला जात नाही. या बाबतीत माझे असे मत आहे की, अजूनही आपण असेच म्हणत आहात की या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल, विचार करु वगैरे. एकाही प्रश्नाला मा.मंत्रीमहोदयांनी धड उत्तर दिलेले नाही. दिनांक १.१.१९९६ पासुन या वेतनश्रेण्या आपण लागू करणार आहात काय ? यासंबंधी त्यानी उत्तर द्यावयास पाहिजे. ते दिले नाही उत्तर देतांना मंत्र्यांनी असे सांगितले की, "केंद्र शासनाने १.१.९६ पासुन द्या म्हटले म्हणून" मागच्या वेळी सुध्दा असेच सांगण्यात आले होते की,"केंद्रशासनाने १.१.९६ पासुन द्या म्हटले म्हणून" त्याबद्दल आम्हा सर्वांना माहिती आहे. मा.राज्यमंत्री सभागृहात काय म्हणाले होते हे मी जसेच्या तसे या ठिकाणी कोट केले होते. पाहीजे तर मी तो भाग पुन्हा कोट करतो. दोघांच्या वतीने त्यांनी तसे सांगीतले होते. पुन्हा एकदा मी जसेच्यातसे या ठिकाणी वाचून दाखविण्यास तयार आहे. मा.मंत्रिमहोदयांनी "नाही " म्हटले म्हणून मी पुन्हा सांगू इछितो.

**श्री दत्ता राणे :** त्या पत्रामध्ये सगळे आहे. त्यामुळे आपण तेच धरुन चाललो आहोत. १.१.१९९६ ही तारीख आपण धरुन चाललो आहोत. त्यापत्रावर आपण विचार करीत आहोत.

**श्री.बी.टी.देशमुख :** दिनांक १.१.१९९६ पासून देण्यासंबंधीचा प्रस्ताव आपण पाठविला आहे काय ? १.१.१९९६ पासून आपण लागू करणार आहात काय?

**श्री.दत्ता राणे :** अध्यक्ष महाराज, या संदर्भात मी वारंवार सांगत आहे की, यु.जी.सी. कडून जे पत्र आलेले आहे. त्यात दिनांक १.१.९६ ते ३१.३.२००० पर्यंत ८० टक्के रक्कम म्हणजे ७२० कोटी रुपये यु.जी.सी. देणार आहे, असे म्हटले आहे आणि १८० कोटी रुपये २० टक्क्याप्रमाणे शासनाला द्यावे लागणार आहेत.

**श्री.बी.टी.देशमुख :** जो प्रश्न मी विचारला नाही त्याचे उत्तर कां दिले जात आहे ?

**श्री.दत्ता राणे :** दिनांक १.१.१९९६ पासून लागू करणार आहात काय? असा प्रश्न विचारण्यात आला होता. जे पॅकेज डिल यु.जी.सी. ने दिलेले आहे त्यातच हे म्हटलेले आहे. त्यावर शासन विचार करीत आहे. कोणत्या तारखेपासून लागू करावयाचे......

**सभापती :** कशासाठी हा सगळा गोंधळ आहे हे मला समजत नाही. विचार करण्यासाठी किती वर्षे लागतात ? शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निर्णय घेऊन शासन मोकळे झाले आहे. चातुर्वर्णाचा प्रश्न निर्माण करण्यात आला आहे. हा शब्द जरी बरोबर नसला तरी सुध्दा व्यवहार तसा आहे. जर तसे ठरलेले आहे, केंद्र सरकारचे आदेशही आहेत. आपली कमिटमेंट आहे की, केंद्र सरकार जे काही ठरविल त्याप्रमाणे राज्य सरकार जसेच्या तसे लागू करील. ८० टक्के रक्कम यु.जी.सी. देण्यास तयार आहे. पैसे केव्हा घेऊन जाणार आहात याबद्दल दोनवेळा त्यांनी विचारणा केली होती. शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत केंद्र सरकारकडून एक पैसा सुध्दा मिळत नाही. या कर्मचाऱ्यांसाठी ८० टक्के रक्कम यु.जी.सी. कडून मिळणार आहे, असे असतांनासुध्दा इतक्या दिवसात निर्णय न घेणे ही गोष्ट काही बरोबर नाही. मी मागे सुध्दा याबाबतीत सांगीतले होते आणि आता पुन्हा यावेळी सुध्दा सांगतो की, प्रस्तावाची छाननी करणे, कॅबिनेटची मान्यता घेणे या सगळ्या गोष्टी लवकर करा. ही माझी आपल्याला सूचना वजा विनंती आणि विनंती वजा सूचना आहे. यासाठी शासनाने अधिक कालहरण करणे बरोबर नाही. त्यातून निष्कारण गैरसमज निर्माण होतात. तसेच आंदोलनास सुरवात होते तसेच आंदोलन चुकीच्या वेळी सुरु झाले, बरोबरच्या वेळी सुरु झाले अशी चर्चा होते. त्यातून एकमेकाबद्दल कठोर बोलले जाते. समाजामध्ये अनेक समज गैरसमज निर्माण होत असतात. तेव्हा असे काही होऊ नये यासाठी लवकर निर्णय घेतला पाहीजे. १९९६ पासूनचा हा विषय आहे आणि आता आपण १९९९ सालामध्ये प्रवेश केलेला आहे. ८० टक्के रक्कम यु.जी.सी. देण्यास तयार आहे तेव्हा मा.मंत्रिमहोदयांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालावे. समक्ष जावे लागले तर समक्ष जाऊन यावे. अर्थात येथे यासाठी कोठे जाण्याचा प्रश्नच येत नाही. केवळ मंत्रिमंडळामध्ये याबाबत निर्णय घेण्यापुरताच प्रश्न आहे. तेव्हा मंत्रिमंडळामध्ये या संबंधात निर्णय लवकरात लवकर म्हणजे केव्हा आपण घेणार आहात याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे म्हणजे हा प्रश्न संपेल. किती महिन्यामध्ये आपण यावर मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेणार आहात ?

**श्री. दत्ता राणे :** अध्यक्ष महाराज, आज मी यासंबंधीचे उत्तर देऊ शकत नाही. परंतु लवकरात लवकर निर्णय व्हावा म्हणून मी या दृष्टीने प्रयत्न करीन.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात.... अडथळा..)

**सभापती :** माननीय मंत्र्यांनी "लौकरात लौकर" असे म्हटले आहे...

**श्री.बी.टी.देशमुख :** ते उत्तर निषेधार्ह आहे...

**श्री. दत्ता राणे :** अध्यक्ष महाराज, मी सुरवातीलाच सांगीतले आहे की, मंत्रिमंडळासमोर हा विषय घेऊन जाण्याचे प्रयत्न मी करीन, परंतु आता आपण जे आदेश दिले आहेत त्याचे पालन केले जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मागील वेळेसही डिसेंबर नागपूर अधिवेशनात मंत्र्यांनी हेच उत्तर दिले आहे. मधल्या काळामध्ये यांनी काही म्हणून काही कामच केलेले नाही...

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात... अडथळा ...)

**सभापती :** आपण सर्वांनी खाली बसावे, सन्माननीय सदस्या श्रीमती नीला देसाई यांना मी प्रश्न विचारण्याची संधी देत आहे. .. पण तत्पूर्वी मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, येथून दिलेल्या आदेश-निदेशाच्याबाबतीत मागील वेळेस काय झाले आहे याची आपणा सर्वांनाच माहीती आहे. म्हणून मी आता या संदर्भात व्यवस्थित स्वरुपात निर्देश देतो. साधारणतः आपले शैक्षणिक वर्ष हे जून महिन्यामध्येच सुरु होते. तेव्हा साधारणपणे १५ जून,१९९९ च्या आत या संबंधीचा निर्णय शासनाने घोषित करावा असा माझा निर्देश आहे आणि पुढे जाऊन मी असेही सांगू इच्छितो की, माझा हा निर्देश काही कारणास्तव शासनाला १५ जून,१९९९ च्या आंत प्रत्यक्षात आणता आला नाही... कारण असे आहे की, मी येथून निर्देश द्यायचा आणि त्याचे पालन त्या तारखेपर्यंत व्हायचे नाही असे होणेही बरोबर नाही. म्हणूनच काही कारणास्तव १५ जून १९९९ पर्यंत माझ्या या निर्देशाची अमलबजावणी करता येणे शासनास शक्य नसेल तर ते का शक्य झाले नाही वा होऊ शकत

नाही. त्यात काय अडचणी आहेत याची स्पष्ट कल्पना समक्ष मला भेटून आणि लेखी स्वरुपात देखील आपण मला द्यावी.

**श्री.दत्ता राणे** : ठीक आहे.

**श्रीमती नीला देसाई** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणी संबंधातील ह्या प्रश्नाविषयी सर्वांच्याच भावना तिव्र आहेत. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, नामदार मंत्र्यांनी जे उत्तर येथे दिलेले आहे ते लक्षात घेता पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या यांना लागू करण्यासाठी केंद्रसरकार ८० टक्के अनुदान देणार आहे, तर हे अनुदान दरवर्षी केंद्र सरकार देणार आहे काय ? की केवळ ५ वर्षापुरतेच हे अनुदान दिले जाणार आहे ? तसे असेल तर त्या पुढील काळात म्हणजे ६ व्या वर्षासाठी आपण काय करणार आहात ?

**श्री. अनिल देशमुख** : अध्यक्ष महाराज, आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की,१.१.१९९६ ते ३१.३.२००० इतक्या कालावधीसाठी युजीसी हे अनुदान देणार आहे आणि त्या पुढील काळामध्ये हे पैसे आपल्याला द्यावे लागणार आहेत.

.....(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात ... अडथळा ... )

अध्यक्ष महाराज, यामध्ये दोन महत्वाचे मुद्दे आहेत. ह्या नविन वेतनश्रेण्या लागू करण्यासाठी युजीसी वा केंद्र सरकार जे ८० टक्के अनुदान देणार आहे, आणि राहिलेला जो २० टक्के भार आहे तो १८० कोटीचा आहे. मात्र १.४.२००० सालापासून यासाठी संपूर्णतः खर्च येणार आहे तो २११ कोटीचा होणार आहे आणि त्यामुळे फार मोठा आर्थिक बोजा हा असल्याने मंत्रिमंडळासमोर गेल्याशिवाय याबाबत निर्णय होऊ शकणार नाही मा.सभापतींनी निर्णय दिला आहे. १४ तारखेपर्यंत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**श्री.रविंद्र मिर्लेकर** : आता जी पदे निर्माण करण्यात आली आहेत, त्यांचे पे स्केल कोणते आहेत ?

**श्री. अनिल देशमुख** : लेक्चरर्सचे एक्झिस्टिंग पे स्केल २२०० ते ४००० आहे.

(गोंधळ)

**सभापती** : आता एका लक्षवेधीवर किती चर्चा करावयाची ? जुने आणि नविन पे स्केलची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

**श्री.सुरेश पाटील** : विद्यापीठ कर्मचारी आणि प्राध्यापकांना दि.१.१.९६ ते २००० पर्यंत लागणारी रक्कम केंद्र सरकार देणार आहे. या व्यतिरिक्त जे कर्मचारी आहेत, त्याबाबत केंद्र सरकार काय करणार आहे ?

**श्री.दत्ता राणे** : त्याचा संबंध नाही. कारण ही पॅकेज डिल आहे. यामध्ये ८० टक्के रक्कम केंद्र सरकार देणार आहे.

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी ३.२० वाजता पुनः भरेल.

* * * * *

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

Registered under the trade Union Act. 1926, No.By-II-8162 of 1985.

(Affiliated to the All India Federation of University and college Teachers' Organisations)

**C.R.Sadasivan** President — **Sambhaji Jadhav** General Secretary

University Club House. B.Road, Churchgate, Mumbai-400 020

# CHARTER OF DEMANDS

## OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS IN MAHARASHTRA

### I. Common Demands :

1. Implementation of the recommendations of the Fifth Central Pay Commission as accepted by the central Government by order dated 30th Sept. 1997 and of the Rastogi Pay Committee as accepted by the central Government by orders dated 27th July 1998 and 6th November 1998. With effect from 1st January 1996, by issuing the state government orders immediately.

2. Payment of arrears on account of revision of pay with effect from 1.1.1996 and arrears on account of other allowances from 1.8.1997, in one instalment as decided by the central government.

3. Immediate withdrawal of government orders including G.R. No. BGT/1097/P.K.24-a (Budget)-19. dated 15th December 1998 in so far as they apply to education reappointment of teachers on honorarium and/or clock hour basis.

### II. Other Demands :

1. Strengthening of our public funded education system.

2. Higher allocation of State funds for higher education.

3. Special provisions for women teachers.

4. Ending of adhoc appointments of teachers in the state.

5. NET/SLET should be made only entry-point qualification condition and not in service qualification.

6. Fixing of an unambiguous minimum passing percentage of mark for NET/SLET examinations.

7. Recognising the past service of Demonstrators/Tutors/ Method Master/Instructors towards counting of qualifying years of experience for career advancement.

8. Counting of service rendered by teachers outside the State anywhere in India for the purpose of pension and other benefits.

9. Condonation of breaks in service by extending the benefit of the rules applicable to school teachers for condonation of break in service upto 1/5th of the qualifying service.

10. Extending the benefit of protection of service to all teachers and laying down a rational and transparent procedure for absorption of surplus teachers.

11. Salary of p/4 category of teachers, who were transferred to the junior college when (10+2+3) pattern of education was introduced and were subsequently brought back to the degree college should be protected, i.e. the salary in the degree college drawn by them at the time of transfer to junior college should be protected when they are brought back to the degree college.

12. The salary of teachers at the time of placement in the Senior Scale and/or selection grade which was fixed with a personal pay (PP) at a lower basic pay than their existing basic pay, should be corrected as per rule 11 of M.C.S.(Pay) Rules, 1981, by giving them the increment that they were entitled to without personal pay.

13. Remission of workload for college teachers undertaking PG work within and/or outside their Universities.

14. Withdraw the government orders on the question of re-fixation and recovery of pay of librarians/Physical Directors.

15. Appointment of Directors of Physical Education in all colleges and filling up of vacancies created by retirements or for other reasons.

16. Extending the benefit of the new G.R. on P/5 category teachers, with retrospective effect from 1.1.1986 for their placement in the scale of Rs. 2200-4000 scale of pay.

17. Pension of teachers to be released with all retirement benefits on the date of retirement of each teacher.

18. Implementation of the recommendations of the petitions Committee in respect of Librarians/Physical Directors with retrospective effect.

19. Enactment of suitable legislation for providing penalties for noncompliance of the recommendations of the grievance committees of the Universities constituted under the new Universities Act. 1994.

20. Ensuring that teachers who participate in Seminars/ Conference/workshop, etc., in Universities and other academic bodies, anywhere in India, get their legitimate TA-DA and other benefits from the State through their respective institutions.

**MUMBAI, 2ND JULY, 1999**

**(Sambhaji Jadhaw)** Gen.Secretary — **MFUCTO** — **(C.R.Sadasivan)** President

# शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक.

*महाराष्ट्र विधानपरिषद* **मंगळवार, दिनांक २० एप्रिल १९९९** *दुसरे अधिवेशन, १९९९*

**सर्वश्री श्री.बी.टी. देशमुख, वसंत चव्हाण, व्ही.यु. डायगव्हाणे, व्यंकाप्पा पतकी, रामकृष्ण मोरे, जयवंत ठाकरे, अजहर हुसेन, सुरेश पाटील, गंगाधर पटने, प.म. पाटील यांचा ठराव.**

**श्री. बी.टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतोः-

"विद्यापीठीय, महाविद्यालयीन, उच्च माध्यमिक, माध्यमिक, प्राथमिक अशा सर्व स्तरांवर व सर्व विभागातून काम करणाऱ्या शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनी प्रभावित होणाऱ्या सर्व वेतनधारकांची शासनाच्या वर्तनाने चार वर्गात झालेली विभागणी, महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९७७ मध्ये राज्य वेतन आयोग न नेमण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन सुध्दा सर्व स्तरावरील शिक्षकांच्याबाबतीत पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याच्या संदर्भात होत असलेला विलंब व त्यामुळे सबंध शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेले अस्वस्थतेचे वातावरण व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**श्री. सुरेश पाटील** : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आता जो सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी प्रस्ताव मांडलेला आहे त्याला कोणते मंत्रीमहोदय उत्तर देणार आहेत याबाबत उत्सुकता आहे.

**श्री. दत्ता राणे** : माझ्या खात्याशी संबंधीतही विषय आहे त्यामुळे मी उत्तर देणार आहे. त्याचबरोबर शालेय शिक्षण विभागाचाही यामध्ये विषय आहे. शालेय शिक्षणमंत्र्यांशी मी बोललो आहे, ते थोड्याच वेळात येत आहेत.

**श्री. सुरेश पाटील** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख यांनी आपल्या प्रस्तावामध्ये ज्या ज्या घटकांचा उल्लेख केलेला आहे, त्या घटकांच्या संदर्भात सभागृहामध्ये लक्षवेधी, अल्पसूचना आणि प्रश्नोत्तरे यांच्या माध्यमातून ज्या ज्या वेळेस प्रश्न उपस्थित झाले त्या त्या वेळेस त्या त्या संबंधीत विभागाच्या मंत्री महोदयांकडून उत्तरे मिळालेली आहेत. आजच्या या प्रस्तावावरील चर्चेमधून जे उत्तर अपेक्षित आहे ते मा. अर्थमंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. त्या त्या विभागाच्या संबंधीत महोदयांकडून उत्तरे मिळालेली आहे. ज्यांच्याकडून उत्तर मिळालेले नाही त्यांनी उत्तर द्यावे म्हणून ही अडीच तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. मला विनंती करावयाची आहे की, या चर्चेला अर्थमंत्री महोदयांनी उत्तर दिले तर बरे होईल.

**तालिका सभापती (श्री. अजहर हुसेन)** : सामुहिक जबाबदारी आहे त्यामुळे ते उत्तर देऊ शकतात.

**श्री. बी.टी. देशमुख** : सभापती महोदय, पाचव्या वेतन आयोगाच्या संदर्भात जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीविषयी मी पहिल्यांदा माहिती देऊ इच्छितो. वेतन आयोगाची गरज का भासते ? हे सांगीतले पाहिजे, तसेच वेतन आयोगाचा जन्म केव्हा झाला हे सांगितले पाहिजे. वेतन आयोगाचा जन्म हा काही गेल्या पाच-पन्नास वर्षातील नाही. वेतन आयोग जुन्या काळापासून आहे. ब्रिटिशांच्या काळापासून आहे. ब्रिटिशांच्या काळामध्ये या धर्तीवर रॉयल कमिशन नेमले जात होते. सन १८८६- ८७ मध्ये ॲक्विसन कमिशन नेमलेले होते. त्यानंतर सन १९१२-१५ मध्ये इस्लींग्टन कमिशन नेमले होते. विशेषतः सुरुवातीला मुख्यत्वे शासकीय कर्मचारी, व नंतर निमशासकीय संस्थामध्ये काम करणारे कर्मचारी आहेत यांना जे काही वेतन आपण लागू करतो ते रुपयामध्ये असते. रुपयाचे मूल्य, वेतनधारकांचा काही संबंध नसलेल्या घटकामुळे, घटत जाते. त्यावर उपाय म्हणून अशाप्रकारच्या वेतन आयोगाची नियुक्त करायची आणि रुपयांचे घसरण मुल्य सावरुन धरण्यासाठी वेतनश्रेण्यांच्या पूनर्रचनेची शिफारस करायची अशाप्रकारचा उद्देश यामागे असतो.

स्वातंत्र्यानंतर दहा ते तेरा वर्षाच्या फरकाने आतापावेतो अशाप्रकारचे आयोग नेमले गेले. वेतन आयोगाच्या कामाविषयीचे स्वरुप पाचव्या आयोगाने आपल्या अहवालातील परिच्छेद क्रमांक १.३ मध्ये सांगितले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की

"Pay Commission are a device by which an independent body investigates the demands of Central Government employees and submits its recommendations which are binding on both Government and its employees. Conceptually, they fall short of a forum for collective bargaining, but they do provide an opportunity for a periodic review by an outside body in whom both the Government and the employees have confidence."

या वेतन आयोगांनी अतिशय महत्वपूर्ण भूमिका यापूर्वीच्या काळामध्ये बजावली. रुपयांचे घसरलेले मूल्य सावरुन धरुन आपल्या शिफारशी दर १०-१२-१३ वर्षांनी केलेल्या आहेत. या वेतन आयोगाच्या शिफारशी तोलामोलाच्या मानल्या जातात व न्यायालय त्यामध्ये शक्यतो हस्तक्षेप करीत नाही. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, आम्ही या वेतन आयोगाच्या कामामध्ये ढवळाढवळ करणार नाही. विशेष गोष्ट असेल त्या वेळीच लक्ष देऊ. सर्वोच्च न्यायालयाने वेतन आयोगाच्या बाबतीत घेतलेली ही स्थिर भूमिका आहे. वेतन आयोगाच्या बाबतीत ते असे म्हणतात की,

" The equation of posts or equation of pay must be determined by expert bodies like Pay Commission. They would be the best judge to evaluate the nature of duties and responsibilities of posts. If there is any such determination by a Commission or Committee, the Court should normally accept it. The Court should not try to tinker with such equivalence unless it is shown that it was made with extraneous consideration. " काही वाईट हेतू ठेवून काही केले असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. एवढ्या मोठ्या कागदपत्रांमध्ये आम्ही जाणार नाही. वेतन आयोगाच्या शिफारशी आम्ही मान्य करु ही भूमिका सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये घेतलेली आहे.

वेतन आयोगाच्या शिफारशींविषयी मुख्यत्वे करुन केंद्र शासनाने नेमलेला वेतन आयोग केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असतो हे खरे असले तरी राज्यामध्ये निरनिराळ्या राज्य शासनांनी धोरणात्मक निर्णय घेतले. महाराष्ट्रामध्ये १९७७ पर्यंत राज्य स्तरावर वेतन आयोग नेमला जात असे. ही पध्दत योग्य नाही असा निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये झाला. १९६६ च्या वेतन श्रेणींची पुनर्रचना झाली. त्यावेळी बडकस आयोग नेमण्यात आला. ७६ साली भोळे आयोग नेमण्यात आला होता. शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षकांसाठी हा राज्य स्तरावरचा वेतन आयोग नेमला. यामुळे कामाला विलंब होतो म्हणून ७६-७७ साली मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात आली. या साठी राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. तो काय होता हे मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. डिसेंबर ७७ मध्ये राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय जो घेतला ते असा होता की, "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारशी वरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल" असा धोरणात्मक निर्णय त्या वेळी घेण्यात आला. हा निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये घेण्यात आला होता त्यानंतर ८६ चे पे रिव्हीजन आले त्या वेळी महाराष्ट्र वेतन आयोग बसला नाही. केंद्र शासनाच्या वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्या महाराष्ट्रामध्ये लागू करण्यात आल्या. त्या बाबतच्या धोरणात्मक निर्णयामध्ये शासनाच्या स्तरावर बदल झाला नाही. ७७ डिसेंबरचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला त्यामध्ये आज सुध्दा बदल झाला नाही. हे जरी खरे असले तरी अंमलबजावणी च्या बाबतीत चार्तुवर्गाची व्यवस्था महाराष्ट्रामध्ये आज अस्तित्वात आलेली आहे. त्याचा उल्लेख मी माझ्या ठरावामध्ये केला आहे.

सभापती महोदय, मी नमूद करु इच्छितो की, आज पाचव्या वेतन आयोगाच्या लाभक्षेत्रामध्ये असलेल्यांचे चार वर्ग झालेले आहेत. यापैकी

**पहिला वर्ग सनदी अधिकाऱ्यांचा आहे.** महाराष्ट्र शासनाने काही केले असले /नसले तरी केंद्र शासनाच्या ३०.९.९७ च्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रातील सनदी अधिकाऱ्यांना १.१.९६ पासून पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्या. हे आय.ए.एस. अधिकारी "शासनाच्या ह्या" विशिष्ट धोरणामुळे नवीन वेतन श्रेण्यांमध्ये पगार घेत आहेत आणि आपल्याला मात्र तो मिळत नाही याचे दु:ख शासनातील इतर कर्मचाऱ्यांनी वर्ष - सहा महिने भोगले. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये या बाबत अस्वस्थता निर्माण झाली. मंत्रालयाच्या सर्व मजल्यावर आंदोलने झाली. परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये ही जी अस्वस्थता होती त्या पोटी उशिरा का होईना पण १० डिसेंबर १९९८ मध्ये याबाबतचा शासन निर्णय काढला गेला आणि **सनदी अधिकाऱ्यांव्यतिरिक्तचे इतर शासकीय अधिकारी व कर्मचारी आहेत** त्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. त्यानंतर **तिसरा गट** म्हणजे दुर्दैवी गट, हा गट **माध्यमिक शिक्षकांचा.** या शिक्षकांमध्ये अशासकीय विद्यालयांमध्ये काम करणारे शिक्षक आहेत. त्यांच्या बाबतीत म्हटले तर शासन निर्णय झालेला आहे. शासनाचा निर्णय होणे आणि शासन निर्णय निघणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. शासनाचा निर्णय काय झाला? पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी या माध्यमिक, उच्च माध्यमिक, प्राथमिक शिक्षकांना लागू करण्यासाठी शासनाचा निर्णय आक्टोबर १९९८ मध्ये इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात ज्यावेळी निर्णय झाला त्यावेळी झाला. पण त्यासंबंधीचा शासननिर्णय मात्र अजून सुध्दा निघाला नाही. अशासकीय विद्यालयामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या संदर्भात अजूनही निर्णय निर्गमित झालेला नाही. झालेल्या निर्णयाच्या काही छटा १० डिसेंबर १९९८ च्या निर्णयामध्ये आहेत. कारण त्यामध्ये शासकीय शाळेतील शिक्षकांचा निर्णय आहे. अनेक बाबतीत त्यामध्ये दोष आहेत. त्या छटा आपण पाहिल्या तर ती स्थिती मी आणि माझे सहकारी तपशीलाने आपणास सांगू. **हे तीन वर्ग झाले.** मी मागे चौथा वर्ण म्हणालो होतो. परंतु माननीय सभापती महोदय चातुर्वर्ण ही शब्दरचना योग्य नाही असे म्हणाले. त्यामुळे त्या दिवसापासून चातुरवर्ग असा शब्द मी वापरायला सुरुवात केली. **आता चौथा वर्ग कोणता झाला? विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा.** त्यांच्या बाबतीत शासनाचा निर्णय झालेला नाही आणि त्यामुळे शासन निर्णयही निघालेला नाही. अशा प्रकारे हा जो चौथा वर्ग झालेला आहे. यांची स्थिती काय? त्यांच्यामध्ये जो असंतेष आहे त्याविषयी मी सांगणार आहे. त्यांच्या विषयी शासनाचा निर्णय झालेला नाही आणि शासन निर्णयसुध्दा झालेला नाही.

अध्यक्ष महोदय, पाचव्या वेतन आयोगाच्या एकूणच शिफारशी राज्य शासनाकडे आल्या त्यावेळी त्या वेळच्या माननीय मुख्य मंत्र्यांनी असे जाहीर केलेले होते की, आम्हाला केंद्र सरकारने या बाबतीत काही तरी मदत दिली पाहिजे तरच आम्हाला याची अंमलबजावणी करता येईल, आणि अशा प्रकारची स्पष्ट मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली होती. किमान ५० टक्के रक्कम तरी केन्द्र सरकारने द्यावी अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली होती. देशातील कोणत्याही राज्याला अशा प्रकारचे अनुदान किंवा मदत केंद्र सरकार देत नाही म्हणून या राज्यालासुध्दा त्यांनी दिले नाही. विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत वेतनवाढीमुळे येणाऱ्या अतिरिक्तभाराच्या ८० टक्के रक्कम पहिल्या पाच वर्षाकरिता केंद्र सरकार देणार आहे. पहिल्या पाच वर्षाच्या एकूण भारापैकी ८० टक्के भार केंद्र सरकार सहन करणार आहे, ही गोष्ट केंद्र सरकारने वारंवार या राज्याच्या उच्च शिक्षण खात्याला कळविली आहे. यासंदर्भात उच्च शिक्षण खात्यामध्ये काहीही निर्णय अजून झाला नाही व त्यामुळे शासननिर्णय झाला नाही.

या क्षणापर्यंत राज्य सरकारचा निर्णयच झालेला आहे अशी स्थिती नाही. याचे कारण काय आहे? याचा विचार करतो त्यावेळी मला असे वाटते की, आम्ही या सभागृहात जसे प्रश्न मांडतो तसे शालेय शिक्षण मंत्री मा.श्री.सुधीर जोशी, शालेय शिक्षण राज्यमंत्री मा.श्री.अनिल देशमुख आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री.दत्ताजी राणे यांनी त्या ठिकाणी कॅबिनेटमध्ये हे प्रश्न मांडले पाहिजे आणि ठामपणाने सांगितले पाहिजे. परंतु दुदैवाने काही गोष्टींच्या बाबतीत लिंक मिसींग आहेत अशी माझी भावना आहे. सभागृहामध्ये दिनांक २२ डिसेंबर १९९८ ला उच्च शिक्षण मंत्र्यांनी आमच्या लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन केले होते त्या लेखी निवेदनामधील पहिलेच वाक्य असे आहे की, **"भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिनांक २७.७.१९९८ रोजी केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करुन राज्य शासनाने या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करण्याबाबतचा विचार करावा असे सुचविले होते."** त्यानंतर ८० टक्के रक्कम देण्याचा हा पुढचा भाग आहे. पाचव्या वेतन आयोगाने दिलेल्या या वेतनश्रेण्या आहेत असा त्या पत्राचा विषय होता. मंगळवार दिनांक २२ डिसेंबर १९९८ रोजी निवेदन करीत असतांना माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी पहिल्याच वाक्यात ही गोष्ट कबूल केली होती परंतु १९९९ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेला आमच्या लक्षवेधीवर या सभागृहात जे निवेदन करण्यात आले होते त्यामध्ये पहिले वाक्य गेले आणि त्या ऐवजी दुसरे व वेगळेच वाक्य आले होते. माननीय मंत्रिमहोदयांना मी मुद्दाम १ एप्रिल १९९९ रोजीच्या अनुपुरक चर्चेत असे विचारले होते की, "Revision of pay-scales of teachers of Universities, & Colleges following the revision of pay-scales of Central Government employees on the recommendations of 5th pay commission." असा त्या केंद्र शासनाच्या २७ जुलै १९९८ च्या पत्रांचा विषय आहे किंवा नाही? त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, " होय, तोच विषय आहे." त्यानंतर मी त्यांना असे म्हणालो की, या ठिकाणी राज्यशासनाने डिसेंबर १९७७ मध्ये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे तो बदललेला नाही तो निर्णय मी मघाशी वाचून दाखविला होता. तो धोरणात्मक निर्णय मी त्या दिवशीसुध्दा सभागृहात वाचून दाखविला होता त्यामुळे मी पुन्हा तो आज आता वाचून दाखवित नाही. त्या दिवशी मी सभागृहामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय वाचून दाखविला की; आता वेगळे पे कमिशन नेमले जाणार नाही पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी शासकीय कर्मचाऱ्यांना आणि इतरांना ज्या लागू केल्या जातात त्या समतुल्य प्रवर्गाना महाराष्ट्रात लागू केल्या जातील अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय भोळे आयोगाच्या वेळी महाराष्ट्र शासनाने घेतला होता. १ एप्रिल १९९९ ला या संदर्भात मी जेव्हा माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारला की, "अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता की नाही.?" त्यावेळी ते असे म्हणाले की, "ही माहिती माझ्याकडे नाही. ती माहिती मी तपासून घेईन." सभापती महोदय, हा प्रश्न या सर्व शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे ज्यावेळी राखून ठेवण्याचा प्रश्न आला त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी हे कबूल केले की, " केंद्र सरकारच्या पाचव्या वेतन आयोगाच्या आधारे या शिफारसी आहेत." त्याचप्रमाणे माननीय मंत्रीमहोदय सभागृहातच मला असे म्हणाले की, "आता आपण जे कोट केलेले आहे त्यासंबंधीची माहिती शासनाच्या दफ्तरी उपलब्ध आहे." **तेव्हा पाचव्या वेतन आयोगाच्या या शिफारसी आहेत ही एक गोष्ट आणि महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये झालेला आहे ही दुसरी गोष्ट आहे.** त्याचप्रमाणे ८० टक्के रक्कम देऊ असे दिनांक २७ जुलै १९९८ रोजी कळविण्यात आले होते हे तिसरे महत्त्वाचे.

ऑक्टोबर १९९८ या महिन्यात इतर सर्वांचे निर्णय ज्यावेळी झाले त्यावेळी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा हा निर्णय का झाला नाही? हे महाराष्ट्रातील या शिक्षकांना जाणून घेण्याचा अधिकार आहे. या चर्चेच्या निमित्ताने ही माहिती कळली पाहिजे. सभापती महोदय, त्यांनी एक गोष्ट सांगितली ती मला मान्य केली पाहिजे. तीन चार विभागांशी याचा संबंध आहे आपण ज्या वेतनश्रेण्या देणार आहोत त्या तीन चार खात्यांना लागू कराव्या लागणार आहेत कृषी खाते, आयुर्वेद, मेडिसीन, सोशल वेलफेअर, इंजिनिअरिंग, तंत्रशिक्षण असे अनेक विभाग यामध्ये आहेत. डिसेंबर महिन्यामध्ये सभागृहात सांगून सुद्धा आपण या निर्णयाप्रत अजून येवू शकलो नाही. १ एप्रिल रोजी जी चर्चा झाली होती त्या चर्चेमध्ये या शासनाच्या वतीने कोणताही निर्णय सभागृहात घोषित होवू शकला नाही.

सभापती महोदय, एक गोष्ट मला पुन्हा सांगितली पाहिजे की, या ठिकाणी ज्यावेळी मा.मंत्रीमहोदय किंवा मा. राज्यमंत्री उत्तर देत असतात त्यावेळी ते शासनाचे मत बोलत आहेत असे आम्ही मानतो. ९ एप्रिल १९९९ ची गोष्ट आहे. सभागृहामधीलच या ठिकाणी बसल्या बसल्या मी त्यांना सुचवून पाहिले. उभे राहून बोलावेसे मला वाटले नाही. सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण राज्य मंत्रीमहोदयांनी त्यादिवशी सभागृहात असे सांगितले की, "सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी मघाशी यु.जी.सी. कडून मिळणाऱ्या पैशाच्या संदर्भात उल्लेख केला होता ७२० कोटी रुपये यु.जी.सी.कडून मिळणार असून राज्य सरकारला १२० कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. त्यात ज्या वेतनश्रेण्या आल्या आहेत त्यामध्ये प्रिन्सिपॉल या पदाची वेतनश्रेणी २२ ते २३ हजार रुपयांची आहे. आपल्या सचिवांच्या वेतनश्रेणी पेक्षा ती किती तरी जास्त आहे. जवळजवळ तीन पटीने ती जास्त आहे" त्याबद्दल मी आता हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. त्यामुळे त्या विषयी मी आता काही बोलत नाही. तुमचे कोटेशन मी प्रोसिडींग मधून घेतले असून ते जसेच्या तसे आता या ठिकाणी वाचून दाखविलेले आहे. तुम्ही हक्कभंगाच्या सूचनेला उत्तर द्या. त्याचे काय व्हायचे ते होईल. ९-४-९९ ला सभागृहात मा.मंत्रिमहोदयांनी काय सांगितले होते हे मी वाचून दाखविले आहे. **आमचे म्हणणे जर तुम्हाला बरोबर समजत नसेल, केंद्र शासनाची कागदपत्रे तुम्हाला वाचता येत नसतील तर मग आमचे तर 'कल्याण'च झाले.** ज्यांनी वेतनश्रेण्या बद्दल मंत्रिमंडळामध्ये किंवा शासनात बोलावयाचे, आमची बाजू मांडायची, त्यांनीच जर असे

सांगितले की, "प्रिन्सिपॉलची वेतनश्रेणी २२ ते २३ हजार रुपयाची असून ही वेतनश्रेणी आपल्या सचिवापेक्षा किती तरी पटीने जास्त आहे. जवळजवळ ३ पटीने जास्त आहे." तर त्या प्रिन्सिपॉलच्या वेतनश्रेण्याचे काय होणार ?

विभागामध्ये काय वातावरण आहे हे त्यावरून दिसून येते. मा.राज्यमंत्र्यांच्या मनामध्ये एवढे विष भरवून देण्यात आले असेल तर मग आम्हाला न्याय कसा मिळणार? मग मी आता आपल्याला या सार्‍याच वेतनश्रेण्या सांगतो. प्राचार्यांना आपण काय वेतनश्रेणी दिलेली आहे? तर त्यांच्याबाबतीत आपण दोन वेतनश्रेण्या दिलेल्या आहेत. २७ जुलै, १९९८ च्या पत्राच्या अनेक्शचर १ मध्ये दिलेले आहे. त्यातील प्राचार्यांच्या निम्न पदासाठी ३७००- ५७०० ही जुनी वेतनश्रेणी असून त्यासाठी सुचविलेली नवीन वेतनश्रेणी आहे १२०००-१८३०० रुपये आणि प्राचार्यांची वरची वेतनश्रेणी आहे ४५००-७३०० ही जुनी आणि त्यांचेसाठी नवीन वेतनश्रेणी दिलेली आहे १६४००-२२४००. अध्यक्ष महाराज, आता आपल्या सचिवांच्या वेतनश्रेणी काय आहेत हे आपण पाहू. सचिव पदाची जी खालची निम्न श्रेणी आहे त्यासाठी सध्याचे स्केल आहे ५९००-६७०० रुपये आणि त्यांच्यासाठी नवीन दिलेली वेतनश्रेणी आहे १८४००-२२४०० रुपये. आणि सचिवांची उच्च पदासाठी जुनी वेतनश्रेणी आहे ७३००-७६०० आणि नवीन दिलेली वेतनश्रेणी २२४००-२४५०० इतकी आहे. **म्हणजे प्राचार्यांची वेतनश्रेणी जेथे संपते आहे तेथे सचिवांची वेतनश्रेणी सुरू होते. असे असताही आमचे राज्यमंत्री महोदय म्हणतात की, "प्राचार्यांची वेतनश्रेणी ही सचिवांच्या पेक्षा तिप्पट आहे म्हणून."** यावरून आपल्याला दिसून येईल की, सचिवांची वेतनश्रेणी ही प्राचार्य यांच्यापेक्षा किती तरी जास्त आहे. असे असता देखील माननीय राज्यमंत्री म्हणतात की, प्रिन्सिपॉलची वेतनश्रेणी ही सचिव पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा किती तरी जास्त आहे आणि त्यामुळे हा निर्णय घेतल्यास सचिवांवर अन्याय होईल. अध्यक्ष महाराज, केवळ यातील वस्तुस्थिती नेमकी काय आहे हे दाखविण्यासाठीच मी ही आकडेवारी आपल्यापुढे सादर केलेली आहे. वरच्या वेतनश्रेणीतील प्राचार्यांच्या वेतनमानाचा शेवट २२४०० हा आहे तर वरच्या श्रेणीतील सचिवांची वेतनश्रेणी २२४०० वर सुरू होते. खालच्या श्रेणीतील प्राचार्यांच्या वेतनश्रेणीचा १८३०० वर शेवट आहे तर खालच्या श्रेणीतील सचिवांची वेतनश्रेणी १८४०० वर सुरू होते.

अध्यक्ष महाराज, त्यानंतर मग उच्च शिक्षणाच्या बाबतीत काय स्थिती आहे? तर त्या बाबतीत यांच्या या चालढकलीच्या धोरणामुळे परिणाम असा झालेला आहे की, विद्यापीठामध्ये वा महाविद्यालयामध्ये क्लर्क, सुपरिटेंडेंट, असि.रजिस्ट्रार यांच्या वेतनश्रेणी या प्राचार्यापेक्षाही जास्त झालेल्या आहेत. कुलगुरुपेक्षा सुद्धा जास्त झाल्या आहेत. **आजची परिस्थिती अशी आहे की, तेथे जो दप्तरी आहे त्याची वेतनश्रेणी ही रीडर पेक्षाही जास्त झालेली आहे.** रीडरची आजची वेतनश्रेणी आहे ३७००-५७०० आणि दप्तरीची ४५००-९५०० ही वेतनश्रेणी आहे, कारण दप्तरीची ही वेतनश्रेणी नवीन वेतनश्रेणी आहे, पाचवा आयोग लागू केल्यानंतरची आहे. अशाच प्रकारे अन्य जे कनिष्ठ श्रेणी धारक आहेत त्यांच्या वेतनश्रेण्या देखील रिडर, प्रोफेसर पेक्षा जास्त झालेल्या आहेत. त्याची सगळी आकडेवारी काही मी येथे देत नाही. व त्याची तुलनाही करीत नाही. कारण त्यांचे हे स्केल्स नवीन आहेत. पण त्यामुळे गेल्या २ महिन्यापासून काय परिस्थिती आहे? तर तुम्ही निर्णय काही याबाबत घेत नाही मग ती परिस्थिती बदलणार कशी? अर्थात नॉन टिचींगच्या बाबतीत आपण पाचवा वेतन आयोग लागू केला त्यांना नवीन वेतनश्रेणी लागू केली ही चांगली गोष्ट झाली, योग्य झाली. पण त्यामुळे असे झालेले आहे की, प्रोफेसर, रिडर, लेक्चरर हे आज तेथील सुपरिटेंडेंट वगैरेपेक्षाही कमी वेतनश्रेणीमध्ये आहेत. तेव्हा आपण जो विलंब यासाठी करीत आहात तो अन्याय्य आहे. म्हणूनच या महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय प्राध्यापक, प्राचार्य आदींच्या बाबतीत निर्णय लौकर येणे आवश्यक आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे तर त्याबाबत देखील अद्याप शासन निर्णय काही अजून निर्गमित झालेला नाही. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी शासनाने मान्य जरुर केल्या आहेत. परंतु त्या यांना लागू केलेल्या आहेत का? त्याचा शासन निर्णय जर निघाला नसेल तर जे प्रलंबित आहेत त्यांचेबाबतीत आपण काय करणार आहात? १० डिसेंबर,१९९८ च्या शासन निर्णयामध्ये जे आपण दिले आहे त्यातील अनेक दोष निरनिराळ्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला आहे. जे खाजगी शाळांतील प्रशिक्षित पदवीधर शिक्षक आहेत त्यांची वेतनश्रेणी ही डाऊनग्रेड त्यामुळे राहिली आहे. माध्यमिक शाळांतील विशेष शिक्षक आहेत त्यांचीही वेतनश्रेणी ही डाऊनग्रेड राहिली आहे. आदवासी विभागातील शिक्षकांची परिस्थिती तीच होती पण सभागृहात प्रश्न आला होता, त्यावेळी शासनाने ही बाब जाहीर करून टाकली. शालेय शिक्षणाच्या विभागात वरची वेतनश्रेणी आणि आदिवासी विभागातील शिक्षकांना खालील वेतनश्रेणी होती. **या ठिकाणी ज्यावेळी या बाबतचे प्रश्न विचारण्यात आले होते, तेव्हा शासनाने आपली चूक मान्य केली.** त्यानंतर सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. ग्रामविकास विभागात देखील अशा प्रकारच्या चुका झालेल्या आहेत. आता त्या चुका अजूनही दुरुस्त झाल्या नाहीत. याची मला माहिती आहे परंतु या चुका दुरुस्त होणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण विभागात सुद्धा शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे.म्हणून मी माझ्या ठरावात म्हटल्याप्रमाणे त्याबाबत त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे. **यामधील दोष दूर करून अशासकिय माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे.**

विशेषतः ग्रामविकास विभागाने शासननिर्णय काढले आणि जिल्हा परिषदेतील लोकांना लागू केले आहेत. या महिन्यात त्यांना नवीन वेतन मिळेल असे वृत्त त्यांना मिळाले. परंतु परवा नागपूर मध्ये कोणत्यातरी अधिकार्‍याने असे सांगितले की, निधी नाही. हे वेतन या महिन्यात देणार नाही. त्यामुळे नागपुरात जिल्हा परिषदेमधील सर्व कर्मचारी बाहेर आले. त्यांच्यामध्ये आज मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. ज्यांना आपण हा वेतन आयोग लागू केला आहे, त्यांना या महिन्यात मिळणारे वेतन पुढील महिन्यात मिळणार आहे, असे कळल्यानंतर एवढा मोठा असंतोष निर्माण होतो. परंतु ज्यांच्या बाबतीत अजूनही शासन निर्णय निर्गमित झाले नाहीत, त्या शिक्षकांच्या मनात केवढ्या मोठ्या प्रमाणात असंतोष असेल याचा अंदाज आपण करा. विद्यापीठीय तसेच महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत अजून निर्णय झालेला नाही. तो निर्णय ताबडतोबीने होणे आवश्यक आहे.

उच्च माध्यमिकच्या बाबतीत जो प्रकार झाला आहे, त्याचा पुनरुच्चार मी करीत नाही. यापूर्वी मी तो तपशिलवार बोललो आहे. मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. त्यावेळी मी जे काही बोललो आहे, ते आज देखील बोलत आहे. उच्च माध्यमिक शिक्षकांना थर्ड सीपीसी मध्ये आणि फोर्थ सीपीसीमध्ये काहीशी हायर वेतनश्रेणी देण्यात आली होती. ही वेतनश्रेणी देशभर नव्हती. तरी आपण विचारपूर्वक दिली होती. अनेक वर्गाना महाराष्ट्रात देखील वरची श्रेणी देण्यात आली होती. इतरांची आपण कायम ठेवली. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबत अजून पावेतो निर्णय झाला नाही. म्हणून या शिक्षकांच्या मनात तिव्र असंतोषाची भावना आहे. अशी भावना शिक्षकांच्या मनात दिर्घकाळ राहणे बरोबर नाही. सभापती महोदय, प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत कोणत्या तरतुदी आहेत, त्या बाबतचा उल्लेख आजच्या प्रश्नोत्तराच्या वेळी झाला आहे. ते मान्यही करण्यात आले आहे. परंतु फक्त मान्य करून चालणार नाही, तर या बाबतीत त्वरीत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. आज या बाबतचा शासन निर्णय निर्गमित होत नसल्यामुळे शिक्षकांच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या समन्वय समितीने मा.मुख्यमंत्र्यांना १५ तारखेला नोटीस दिली. या बाबतचा आंदोलनाचा कार्यक्रम या नोटीसमध्ये त्यांनी सांगितला आहे. २१ जुलै १९९९ या तारखेपासून बेमुदत संप करण्यात येणार आहे. त्यापूर्वी ७ जुलै १९९९ ला एक दिवसाचा लाक्षणिक संप आहे.** या ठिकाणी जो असंतोष आहे तो दूर करावा, परंतु या सरकारने असंतोष दाबण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे असंतोष दाबण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही.

माझे याबाबतीत एकच म्हणणे आहे की, मागच्या वेळी सभागृहामध्ये प्रश्न आला होता त्यावेळी माननीय सभापतींनी २२ डिसेंबर ९८ रोजी सभागृहामध्ये विद्यापिठीय, महाविद्यालय शिक्षकांच्या बाबतीत असे सांगितले की,"पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे राज्य शासकीय कर्मचार्‍यांना ज्या तारखेपासून वेतन द्यावे लागणार आहे त्याबाबतीत शासनाने तत्वतः निर्णय घेतला. त्याबाबत प्रत्यक्ष कार्यवाहीला वेळ लागला असला तरी तशाप्रकारचा तत्वतः निर्णय घेण्यात आला होता. म्हणून तशापद्धतीचा तत्वतः निर्णय घेणे आवश्यक होते तो झाला नाही ही गोष्ट बरोबर झालेली नाही. यासंबंधीचा निर्णय जेव्हा करावयाचा असेल तेव्हा तो आपण करू शकता." आणि परवा सभागृहामध्ये या विषयावर चर्चा होत असतांना माननीय सभापतींनी जाणीवपूर्वक सांगितले की, "**कोणत्याही परिस्थितीत १५ जूनपूर्वी यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे.**" आणि पुढे त्यांनी असेही सांगितले की, "आपल्याला जर निर्णय घेता येणे शक्य झाले नाही तर तो कोणत्या कारणांमुळे शक्य झाले नाही हे सभापतींना कळविले पाहिजे." माझे म्हणणे असे आहे की, चार-पाच गोष्टींची माहिती या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडून मिळाली पाहिजे. **२७ जुलै ९८ ला केंद्र सरकारचे ८० टक्के सहाय्य देणारे पत्र येवूनसुद्धा तुम्ही आजपर्यन्त निर्णय का घेतला नाही? हा निर्णय केव्हापासून घेणार? ही वेतनश्रेणी कोणत्या तारखेपासून लागू करणार?** हे मंत्रिमहोदयांनी आतापर्यन्त या सभागृहामध्ये सांगितले नाही त्याची आम्ही सर्वांनी नोंद घेतलेली आहे. आणि पुन्हा पुन्हा सभागृहामध्ये सांगतात की, "केंद्र सरकारने १.१.९६ पासून वेतनश्रेणी लागू करण्याबद्दल कळविले आहे." त्यांनी आपल्याला काय

कळविले आहे हे आम्हाला माहित आहे. परंतु तुम्ही कोणत्या तारखेपासून लागू करणार आहात ते सांगा? हे मी पुन्हा पुन्हा मंत्रिमहोदयांना विचारीत असतांना ते नेमके तेवढेच सांगत नाहीत.

मा.राज्यमंत्री एकदा बोलले की, माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांनी सांगितले की, "१.१.९६ पासून लागू केले पाहिजे अशी आपण शिफारस करु. परंतु शेवटी कॅबिनेटने यावर निर्णय घ्यायचा असल्यामुळे त्या अगोदर उत्तर देता येणार नाही." हे उत्तर डिसेंबर १९९८ मध्ये सांगितले आहे. त्यानंतर कॅबिनेट झालीच नाही काय? शिक्षकांच्या मनात स्वाभाविकपणे अशी भावना येते की ही कॅबिनेट केव्हा होणार आहे? ही अस्वस्थता त्यांच्या मनात आहे. तेव्हा प्रश्न पहिला असा की, १.१.९६ पासून वेतनश्रेणी लागू करणार आहोत असे आपण आज सभागृहामध्ये सांगणार आहात की नाही? दुसरा प्रश्न असा की जर लागू करायची असेल तर त्याबाबतचा निर्णय आपण केव्हा निर्गमित करणार? तिसरे असे की, १५ जूनच्या अगोदर आपण शासन निर्णय निर्गमित करणार आहात की नाही? आणि चौथा प्रश्न असा की, शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत १० डिसेंबर १९९८ च्या शासन निर्णयातील सर्व दोष दूर करून किती तारखेला आदेश निर्गमित केले जाणार? कोणत्या दिवशी निर्गमित केले जाणार? याची माहिती आम्हाला पाहिजे. आणि मघाशी सांगितल्याप्रमाणे ते निर्णय निघतांना त्यामधील असलेले दोष दुरुस्त झाले पाहिजेत. माझी खात्री आहे की, या चर्चेच्या निमित्ताने गेले पाच-सहा महिने या दोन विभागामध्ये जे मंथन चालू आहे त्यातून काहीतरी बाहेर येईल आणि त्याबाबतची माहिती सभागृहाला होईल एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

**प्रस्ताव प्रस्तुत झाला.**

**तालिका सभापती :** इस प्रस्तावपर बोलनेवाले सदस्योंकी संख्या १३ है. इसलिए प्रत्येक सदस्य को ७-८ मिनट का समय दिया जाएगा

* * * * *

*मंगळवार, दिनांक २० एप्रिल १९९९ रोजी या प्रस्तावावर अडीच तास चर्चा झाली. प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रस्ताव मांडणारे उपरोक्त भाषण केले. त्यानंतर श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री.व्ही.यु.डायगव्हाणे, दिवाकर पांडे, सुरेश पाटील, प.म.पाटील, सुरेश भालेराव, प्रकाश जावडेकर, व्यंकाप्पा पतकी, प्रा.रामकृष्ण मोरे, रामदास फुटाणे या सदस्यांनी प्रस्तावावरील चर्चेत भाग घेतला. मा. उच्च शिक्षणमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांनीही चर्चेत भाग घेवून शासनाची भूमिका मांडली. उभय मंत्रिमहोदयांची भाषणे झाल्यावर प्रा.बी.टी.देशमुख यांनी चर्चेला उत्तर देणारे भाषण केले.मा. उच्च शिक्षणमंत्री यांचे भाषण व प्रा.बी.टी.देशमुख यांनी चर्चेला उत्तर देणारे जे भाषण केले ते पुढे दिलेले आहे. मा. शालेय शिक्षणमंत्री यांच्या भाषणातील काही अंश नमूद केलेले आहे.*

* * * * *

**श्री.दत्ता राणे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) :** सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, दिवाकर पांडे, सुरेश पाटील, सुरेश भालेराव, प्रकाश जावडेकर, व्यंकाप्पा पतकी, प्रा.रामकृष्ण मोरे, रामदास फुटाणे इत्यादी माननीय सदस्यांनी ही चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेमधून विशेषतः उच्च शिक्षणामध्ये पाचवा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीचा मुद्दा हा महत्वाचा आहे. यासंबंधी ज्यावेळी उच्च शिक्षणाच्या संबंधी केंद्र सरकारने जो विचार केला, आयोग नियुक्त केला आणि त्या आयोगाच्या शिफारशी केंद्र सरकारचे निर्णय राज्यसरकारी कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील आणि ती वेतननिश्चिती सुद्धा केंद्र सरकारप्रमाणे यांनाही राहील. अशा तऱ्हेचा एकूण यासंबंधीचा मुद्दा आहे. याठिकाणी समितीने शिफारशींचा विचार करून वेतन सुधारणा करण्यात आली होती. त्यामध्ये दि.१ जानेवारी १९९६ पासून केंद्र सरकारप्रमाणे पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे आदेश निर्गमित केले. यामध्ये दि.१ जानेवारी ९६ पासून सुधारीत वेतनश्रेणी विहित केल्या. आणि त्यामुळे यासंबंधीच्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुकथनकर समितीने खालील पाच गोष्टी मांडल्या. त्याच्यात पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने निर्णय विचारात घेवून खालील पदांच्या वेतनासंबंधी शिफारशी करणे, उच्च शिक्षणामधील विद्यापीठ शिक्षकांच्या आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या यासंबंधीचे या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, यामध्ये जो माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या भाषणामधून धोरणात्मक निर्णय जो आहे आणि म्हणून त्यांनी जो याठिकाणी विषय मांडला, त्या विषयाच्या विषयामध्ये दि.२७.७.९८ चे जे पत्र आहे. त्यापत्रासंबंधी स्पष्ट भूमिका केंद्राची जी आहे, केंद्रीय विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये हा त्यामध्ये उल्लेख आहे. या महाविद्यालयातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसह लागू केलेल्या वेतनश्रेण्या व इतर बाबी राज्य शासनाने त्यांच्या अखत्यारीतील विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा विचार सुचविलेला आहे. यानंतर १७.११.९८ रोजी या बाबतचे एक स्मरणपत्र, वेतनातील त्रुटी दुर करण्याबाबत लिहिले. त्या संबंधीचाच आजचा हा विचार आहे. तो हा आहे की, **या संबंधीचा धोरणात्मक निर्णय शासन केव्हा घेणार आहे? विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या शिक्षकांना वेतनश्रेण्या केव्हा लागू केल्या जाणार आहेत? जवळजवळ याला सहा महिने झालेले आहेत. हा प्रश्न वारंवार सभागृहापुढे वेगवेगळ्या मार्गाने उपस्थित करण्यात आला ही गोष्ट खरी आहे. या बाबत वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने झाली याची नोंद देखील शासनाकडे आहे.** मा.सदस्यांनी सांगितले की, हा असंतोष दाबून टाकण्याचा शासनाचा विचार आहे. शासन यांच्यासमोर नेहमीच अडचणी उभ्या करते. शासनाने वेगवेगळ्या ज्या वेतनश्रेण्या मांडलेल्या आहेत त्यामधून असे भासविण्याचा प्रयत्न करण्यात आला की, शासन यांच्यासाठी काहीही करीत नाही.

मला आपल्याला सांगावयाचे आहे की, आपण आजची वास्तविक स्थिती लक्षात घेतली पाहिजे. **वास्तविक पहाता याचा आणि वेतनवाढीचा काही संबंध नाही तरी देखील मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की,** मध्यंतरी कॉमर्स आणि सायन्स शिक्षकांचा २० तासिकांचा प्रश्न निर्माण झाला. ते सरप्लस झाले. अशा १२०० शिक्षकांना शासनाने सामावून घेतलेले आहे. एखादा कारखाना वर्ष झाल्यानंतर मालक कामगारांना सांगतो की, तुम्ही तुमचा पगार घ्या, नुकसान भरपाई घ्या आणि जा. शासनाचे असे धोरण नाही. शासनाने या सर्व शिक्षकांच्या जवळपास ट्रान्सफर केल्या आणि त्यांना न्याय दिला. आजही महाराष्ट्रामध्ये जवळपास ८९ शिक्षक असे आहेत की, त्यांच्याकडे कॉमर्स आणि सायन्स मधील विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी आहे. मध्ये मला काही शिक्षक, प्राध्यापक भेटून गेले. त्यांचे म्हणणे होते की, संस्कृत आणि काही जुने विषय टिकून राहीले पाहिजेत. वास्तविक पाहता अशा अभ्यासक्रमांसाठी केवळ ३ ते ४ च विद्यार्थी असतात. तरी देखील ते विषय आजही शिकवले जात आहेत. अशी ही एकूण वेगवेगळी परिस्थिती आहे. मुलांचा कल आज तंत्रज्ञानाकडे वळल्यामुळे ही स्थिती निर्माण झालेली आहे असे माझे मत आहे. या सर्व परिस्थितीमध्ये शासनाच्या थोड्या आर्थिक अडचणीमुळेही यांना थोडा विलंब झालेला आहे.

महाविद्यालयीन नॉन टिचिंगच्या कर्मचाऱ्यांच्या बाबत निर्णय घेतलेला आहे. म्हणून यांच्या वेतनश्रेणी संबंधीचा ज्यावेळी विचार येत आहे त्यावेळी केन्द्र सरकारने १७.११.९८ ला पत्र पाठविले होते त्याची तपासणी वित्त विभागामध्ये करून ही बाब शासनाकडे प्रलंबित होती. यासंदर्भात वेगवेगळ्या प्रकारची माहिती गोळा करण्यामध्ये वेळ गेलेला आहे. याची अंमलबजावणी करताना केन्द्र सरकारकडून ७२० कोटी रुपये आपल्याला मिळतील आणि १८० कोटी रुपयांची तरतुद इ.स.२००० सालापर्यन्त करावी लागणार आहे. दिनांक १.१.१९९६ पासून २००० सालापर्यन्त एवढी रक्कम तयार करुन २००० सालानंतर २०० कोटींचा भार आपल्याला सहन करावा लागेल.

**म्हणून शासनाने जे उत्तर दिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, या संबंधीच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यावर यासंबंधीचे आदेश जरुर निर्गमित करू.** एक आठवड्यापूर्वी मी स्वतः यामध्ये लक्ष घालून तपासणी केली. वित्त विभागानेही तपासणी केली असून त्यांच्याकडून खर्चाचा आकडा आलेला आहे. **ही बाब जी.ए.डी.कडे गेल्यानंतर कॅबिनेट नोट तयार होण्यापर्यन्तची स्थिती आलेली आहे.** मध्यंतरी हीच भूमिका मी या ठिकाणी मांडत असताना निश्चित वेळ सांगा असा आग्रह धरला होता. माननीय सभापतींनीसुद्धा आग्रह धरला होता. परंतु यामध्ये रक्कमेचा निर्णय आहे त्यामुळे शासनाचा निर्णय आणि आदेश होत नाही तोपर्यन्त मला निर्णय देता येत नाही असे मी माननीय सभापतींना म्हणालो होतो. मी आपल्या आसनाचा आदर करून म्हणालो होतो. चार प्रश्न या ठिकाणी निर्णय घेण्याचे राहिले. केन्द्राचे पत्र आले त्या बाबतीत निर्णय घेण्याचे काम सुरू झाले आणि त्याप्रमाणे वित्त विभागाने त्याची नोंद घेऊन काम सुरु केले आहे. मी आता खर्चाचा आकडा सांगितला आहे. तो १.१.९६ पासून २००० पर्यन्तचा आहे. यासंदर्भात कॅबिनेटमध्ये अजूनपर्यन्त निर्णय झालेला नाही. **याचे कारण कोणताही विषय या ठिकाणी बोलल्या बरोबर कॅबिनेटमध्ये येतो असे नाही. या ठिकाणी जे माजी मंत्री बसले आहेत त्यांना याची माहिती आहे. ज्यावेळी एकूण वित्तभार आणि आवश्यकता या दृष्टीने विचार करता शासनाला कदाचित असे वाटले असेल की, शिक्षक मंडळी आहेत ती धिराने घेतील. दुसरा कामगार असता तर तो नाही म्हणाला असता. म्हणून शासनाचा असा विचार झाला असेल.**

**श्री.अरुण मेहता :** शासनामध्ये तुम्हीपण आहात ना?

**श्री.दत्ता राणे :** मीही आहे. **आपल्याला माहिती आहे की, शिक्षक संयमी आहेत. त्यांची आपुलकी आपल्याबरोबर राहील. यामुळे विलंब झाला तरी शासनाचा हेतू स्पष्ट आहे.** मघा एका सन्माननीय सदस्याने असे सांगितले की, शिक्षणाच्या संदर्भात जे आयोग नेमले होते त्यांच्या शिफारशींची

अंमलबजावणी झाली नाही. हे कोट करणे बरोबर नाही. वेतन आयोग ही घटनात्मक गोष्ट आहे आणि यामध्ये शासनाची बांधिलकी आहे पण याकरिता काही वेळ लागतो. माननीय सभापतींनी सुद्धा त्यासाठी काही वेळ निश्चित केली आहे. माननीय सभापतींनी त्यावेळी असे सांगितले होते की या बाबतीत **१५ जून पर्यन्त निर्णय घ्यावा. त्यांनी शासनाला तसा आदेश दिला होता. त्यांनी पुढे असेही सांगितले होते की या संबंधी काही अडचणी असतील तर मला येऊन भेटा आणि चर्चा करा. १५ जून १९९९ पर्यन्त या बाबतीत निर्णय घ्यावा असे माननीय सभापतींनी शासनाला सांगितले होते.** मी या निमित्ताने सांगू इच्छितो की या संदर्भात आणखी काही प्रश्न आहेत. यु.जी.सी.च्या संदर्भातील काही मुद्दे आहेत.

१२ तारखेला मी माननीय मंत्रिमहोदयांना भेटलो होतो आणि मुलींच्या होस्टेलकरता आम्हाला पैसे द्या असे मी त्यांना सांगितले होते. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की माध्यमिक, प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्याही होस्टेलकरता योजना आहेत परंतु महाराष्ट्राने पैसे उचलले नाहीत. त्यावेळी मी त्यांना असे सांगितले की दहावी पर्यन्त मुले पालकांकडे राहतात त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना होस्टेलमध्ये जाण्याची गरज भासत नाही. प्लॅनिंगचे लोक सुद्धा त्या ठिकाणी बसलेले होते. तेव्हा दहावीपर्यन्तची जी अट आहे त्या अटीमध्ये १० अधिक २ असे इनक्लुड करा तसेच आय.टी.आय. चा समावेश करा असे मी सांगितले होते. आय.टी.आय. मध्ये शिक्षण घेणाऱ्यांना होस्टेलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मदत करा असे सांगितल्यानंतर त्यांनी असे सांगितले की ही बाब तपासून पाहिली जाईल.

या ठिकाणी जे काही काम करावयाचे आहे ते आम्ही केलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे काही विचार या ठिकाणी मांडलेले आहेत ते विचार लवकरात लवकर अंमलात आणण्याचा प्रयत्न करू. **१५ जून १९९९ पूर्वी निर्णय घेण्याच्या बाबतीत माननीय सभापतींनी आदेश दिलेले आहेत तेव्हा त्या बाबतीत आम्ही विचार करू.** एवढे निवेदन करून मी माझे भाषण संपवितो.

## शालेय शिक्षण मंत्री मा. श्री.सुधीर जोशी यांच्या भाषणातील काहीं अंश

**श्री.सुधीर जोशी (शालेय शिक्षण मंत्री)** : सभापती महोदय, या प्रस्तावावर जे सन्माननीय सदस्य बोलले आहेत त्या सर्वांची नावे मी पुन्हा घेणार नाही. माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी त्या सर्व सन्माननीय सदस्यांची नावे यापूर्वी घेतलेली आहेत तेव्हा या सर्व सन्माननीय सदस्यांना मी धन्यवाद देतो......

........ **खरे तर यामध्ये ज्या काही त्रुट्या आमच्या मते आहेत त्या आम्ही मुद्दामहून त्रुटी समितीकडे पाठविल्या नाहीत, कारण त्या आम्ही आमच्याच स्तरावर सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. जवळपास ९०-९५ टक्के त्यांनी ज्या त्रुटी दाखविल्या होत्या त्या काढून टाकण्याचा प्रयत्न आम्ही केला असून त्यातील जवळ जवळ ९० ते ९५ टक्के त्रुटी या सोडविलेल्या आहेत. दूर केल्या आहेत.** तेव्हा उच्च शिक्षण मंत्र्यांनी आताच सांगितल्याप्रमाणे १५ जूनच्या आत किंवा त्यापूर्वी महिनाभरामध्ये देखील हे करता आले तर आम्ही करणार आहोत. **आता सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख यांच्या भाषेमध्ये सांगावयाचे तर याबाबतीत शासन निर्णय झालेला आहे. परंतु शासन निर्णय निघायचा आहे आणि तोही आम्ही लवकरात लौकर काढू आणि आपण जी अंतिम तारीख दिलेली आहे त्यापूर्वीच ते करण्याचा प्रयत्न करू एवढेच मी या निमित्ताने आपल्यापुढे सांगु इच्छितो.......**

........ असो. अध्यक्ष महाराज, **या प्रकरणी मी एवढेच सांगू शकेन की, असलेल्या जवळजवळ सगळ्या त्रुटी आम्ही वेळ काढू पणा करावयाचाच असता तर त्रुटी समितीकडे पाठविल्या असत्या आणि एकदा का त्या त्रुटी समितीकडे पाठविल्या असत्या तर त्यातून किती कालावधी गेला असता याची कल्पना आपण करू शकता. परंतु आम्ही तसे केलेले नाही** हे आपण लक्षात घ्यावे. आम्ही आमच्याच स्तरावर त्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला आणि माझी खात्री आहे की, या सगळ्या त्रुटी दूर केल्यानंतर कोठलेही काळजीचे कारण शिक्षकांना मिळेल असे मला वाटत नाही. अर्थात काळजी करायचीच म्हटले तर तसे कारण मिळेलही. **परंतु यामध्ये कोठल्याही प्रकारे तसे कारण आम्ही ठेवले आहे असे वाटत नाही. जेवढे लवकर होईल तेवढ्या लवकर म्हणजे १५ जूनच्या आत निर्णय करू. या दृष्टीने आम्ही योग्य ते प्रयत्न करू. एवढेच सांगून मी माझे भाषण संपवितो.**

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने अत्यंत विधायक व उपयुक्त अशी चर्चा या सदनात झाली आहे. दोन्ही बाजूच्या मा. सदस्यांनी यामध्ये भाग घेतला व आपले विचार व्यक्त केले. त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. मला या ठिकाणी दोन-तीन मुद्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री.सुधीरभाऊ जोशी यांनी १५ जून च्या आत या बाबतचा निर्णय करू असे सांगितले आहे. म्हणून ही बाब निश्चितपणे स्वागतार्ह समजली पाहिजे. आता याठिकाणी ताबडतोबीने आजच्या आज जी.आर.काढा असे काही मी म्हणालो नाही. परंतु माध्यमिक शिक्षकांपैकी ५० ते ६० टक्के लोकांना ही वेतनश्रेणी दिली हे खरे नाही. शासकीय विद्यालयातील १० ते १५ टक्के लोकांना ती दिली आहे. अशासकीय शालेय शिक्षकांच्या बाबतीत अजून शासन निर्णय निर्गमित झालेला नाही. आता याबाबत १५ जूनच्या आत निर्णय होणार आहे, त्याबद्दल मी स्वतः समाधान व्यक्त करतो. आता उच्च शिक्षणांबाबत सांगतो. या ठिकाणी आम्हाला समाधानकारक उत्तर मिळाले म्हणजे समाधानकारकरित्या चर्चा झाली आहे असे मी म्हणणार नाही. मानणार नाही. मा.उच्च शिक्षण विभागाच्या मंत्र्यांचे या ठिकाणी अत्यंत असमाधानकारक उत्तर रेकॉर्डवर आले आहे. हे योग्यच झाले. असमाधानकारक उत्तराची नोंद कामकाजामध्ये झाली म्हणजे चर्चा समाधानकारक रित्या झाली असे मी समजणार. त्यांनी असे म्हटले की, "१५ जून पर्यन्त या बाबतचा निर्णय करू नाहीतर कळवू." १५ जूनच्या आत या बाबतचा निर्णय ते करणार आहेत काय? हे त्यांनी सांगीतले नाही.

**श्री.दत्ता राणे** : सभापती महोदय, या ठिकाणी मा.सभापतींनी आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे मी त्याचा उल्लेख केला आहे. तेच सुत्र स्वीकारून आम्ही १५ जूनच्या आत सुचवू.

**श्री.बी.टी.देशमुख** : १५ जूनच्या आत निर्णय कराल काय?

**श्री.दत्ता राणे** : होय. मा.सभापतींनी या बाबत निर्णय दिला आहे. यामध्ये जर काही अडचण असेल तर त्या प्रमाणे करु. या अध्यक्षांच्या निर्णयाच्या बाहेर मी कसा बोलू. सभापती महोदय, या ठिकाणी निवेदनामध्ये स्पष्टपणाने लिहिले आहे. **मा.सभापतींनी सांगितल्याप्रमाणे १५ जूनपर्यन्त एकत्र यावयाचे आहे. आणि निर्णय करावयाचा आहे. शासनाला जर काही अडचणी असतील तर तो चर्चेचा विषय होईल. या बाबत चर्चा होणार आहे. १५ जूनपर्यन्त मा.सभापतींबरोबर या बाबतची चर्चा होणार आहे.**

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, याठिकाणी अपमानास्पद असे उत्तर दिले जात आहे.

**श्री.दत्ता राणे** : सभापती महोदय, अर्थात जो निर्णय होणार आहे, तो कॅबिनेटसमोर जाणार आहे. १५ जून पर्यन्त करावयाचे आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : मा.मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर आम्ही काळजीपूर्वक ऐकले आहे. ऐकत आहोत. मा.मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "१५ जूनपर्यन्त निर्णय करू. मा.सभापतींनी असे आदेश दिले होते की, १५ जूनपर्यन्त या बाबतचा निर्णय करा. न केल्यास न होण्याची कारणे कळवा." आता मा. मंत्रिमहोदयांकडून जरी असमाधानकारक उत्तर आले असले तरी त्यांची काय स्थिती आहे हे आम्हाला कळले व त्यामुळे आमचे "समाधान" झाले आहे. आता या ठिकाणी १५ जूनपर्यन्त निर्णय करू. असे म्हटलेले नाही.

**श्री.दत्ता राणे** : उत्तरामध्ये तसे लिहिले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : मा.मंत्रिमहोदय जो कागद दाखवितात तो विभागाने त्यांना दिलेली माहिती आहे. ती फक्त तुमच्या हाती आहे. अशा चर्चेमध्ये ती काही सर्क्युलेट होत नसते. इथे निवेदन वगैरे काही नाही. मा.सभापतींनी आदेश दिल्याप्रमाणे ही बाब या ठिकाणी क्लिअर झाली पाहिजे. आता याठिकाणी असे सांगितले आहे की, जमले तर १५ जूनपर्यन्त करू. म्हणून काय करणार ते आम्हाला कळले पाहिजे.

**श्री.दत्ता राणे** : यासंबंधी सुरुवातीला मी सांगितले आहे. हा निर्णय आहे त्यासंबंधीची माहिती मी सभागृहासमोर दिली आहे. आणि म्हणून हा निर्णय १५ जूनपर्यन्त करण्याचे मा.सभापतींनी आदेश दिले होते त्याप्रमाणे तो गृहीत धरून त्याबाबत मंत्रिमंडळाचा निर्णय करावयाचा आहे. त्या अगोदर नोट तयार झाली, **त्यासंबंधी मा.सभापतींशी चर्चा करून निर्णय घेऊ.**

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता ज्या शब्दामध्ये उत्तर दिले आहे ते सर्वांना कळले आहे. मी सुरुवातीला सांगितले आहे की, सभागृहामध्ये असमाधानकारक उत्तर नोंदविले जाणे हे सुद्धा चर्चेचे एक समाधानच आहे. मी त्यांच्या माहितीसाठी मग आता असे सांगतो की, फेब्रुवारीपासून महाराष्ट्रात काय परिस्थिती निर्माण झाली. ४ फेब्रुवारीला शासन निर्णय निघाला. आपण शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी नोटिफिकेशन काढले. योग्य आहे, त्याबद्दल दुमत नाही.

व्हाईस चॅन्सेलरला प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून सहाय्यक कुलसचिव दर्जाचा

एक अधिकारी असतो. मार्च- एप्रिल मे महिन्यात त्याची नेमणूक ८०००-१३५०० या स्केलवर होणार. मी हे मघाशी मुद्दाम सांगितले. पण थोडक्यात सांगितले. ते बसल्या बसल्या म्हणाले की, 'माझ्या लक्षात आले' मला वाटले होते की, ते बरोबर लक्षात घेवून काहीतरी सांगतील. म्हणून मी ही गोष्ट त्यावेळी विस्ताराने मांडली नाही पण मग आता मी इथे नमूद करतो. आज उद्या परवा जे व्हाईस चॅन्सेलर नेमले जातील त्यांची नेमणूक ७८०० रुपये फिक्स्ड पगारावर होणार आहे. महाराष्ट्रात मार्च एप्रिल मे या महिन्यात ही पोझीशन रहाणार आहे. विद्यापीठातील सुपरिंटेंडेंची नेमणूक मार्च एप्रिल मे महिन्यात ६५००-१०५०० या वेतनश्रेणीमध्ये रुपये ६५०० या मुळवेतनावर होईल आणि एम.एसस्सी. पी.एच.डी. डि.लिट. झालेले विद्यापीठातील प्रोफेसर ची नेमणुक ४५०० या बेसिकवर होईल. सिलेक्शन ग्रेडमधील लिपिकाची नेमणूक ५५०० या बेसिकवर होईल. विद्यापीठातील रिडर हा पी.एच.डी.असल्याशिवाय होवू शकत नाही. त्याची नेमणूक ३७०० या वेतनश्रेणीमध्ये होईल. महाराष्ट्रामध्ये ही स्थिती निर्माण झाली आहे. तिचा आणखीन एक परिणाम विद्यापीठातील अधिव्याख्याता या पदावर होईल. १९९९ च्या मार्च-एप्रिल-मे महिन्यात अधिव्याख्याता २२००- ४००० या वेतनश्रेणीमध्ये नेमला जाईल. रेकॉर्ड लिफ्टर हा २६१०-४००० या वेतनश्रेणीत नेमला जाईल, प्रमुख चौकीदार २६१०-४००० या वेतनश्रेणीत नेमला जाईल तसेच दफ्तरी २६१०- ४००० या वेतनश्रेणीत नेमला जाईल. ही स्थिती फेब्रुवारी ९ पासून महाराष्ट्रात राहणार आहे. व तुमचा निर्णय होत नाही तो पर्यंत राहणार आहे.

आपण म्हणता की, १५ जूनपर्यन्त निर्णय करू, नाहीतर सभापतींबरोबर चर्चा करून त्यांना कारणे कळवू, ही गोष्ट बरोबर नाही. ही अत्यंत असमाधानकारक अशी गोष्ट आहे. मा.शालेय शिक्षण मंत्र्यांनी दिलेल्या उत्तराबद्दल मी निश्चितपणे समाधानी आहे. तुम्ही १५ जूनपर्यन्त म्हणालात. मी अत्यंत आदरपूर्वक सुधीरभाऊ तुम्हाला सांगतो की, तुम्ही जे बोलला ते जबाबदारीने बोललात. लवकरात लवकर असे न म्हणता तारीख दिली पाहिजे. असा आम्ही आग्रह धरतो तरी तुम्ही ती देत नाही. आज तुम्ही दिली आहे. शासन निर्णय इथच्या इथे काढा इथे मी कसे म्हणेन? ते मी म्हणणार नाही. मंत्र्यांनी सांगितल्यावर त्यावर विश्वास ठेवायचा नसेल तर आपल्याला काहीही काम करता येणार नाही. अशी पद्धत असू शकत नाही. आपण सभागृहात जे म्हणालात त्यावर निश्चितपणे भरवसा आम्हाला ठेवावाच लागतो. आणि याबद्दल तुम्हाला गैर वाटावे असे आमचे कुणाचेही वर्तन नाही. याठिकाणी दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांनी विचार मांडले त्या सर्वांचे मी आभार मानतो.

